# स्नेहबंध

## अभिप्राय पुस्तिका



SVERI

"Engineering for Excellence"

Shri Vithal Education & Research Institute's

**COLLEGE OF ENGINEERING, PANDHARPUR**



# प्रस्तावना

सर्व विद्यार्थी मित्र-मैत्रिणी, पालक बंधू-भगिनी, स्नेही, हितचिंतक, स्वेरी परिवाराचे सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक बंधू-भगिनी यांना माझा सप्रेम नमस्कार!

१९९८ साली गोपाळपूरच्या माळरानावर अभियंता मित्रांना बरोबर घेऊन एका ज्ञानसत्राची आम्ही सुरुवात केली. या भूमीवर तंत्रशिक्षणातले ज्ञान प्रदान करणारे 'नंदनवन' उभे करण्याचे स्वप्न आम्ही पाहिले. आपल्या सगळ्यांच्या खंबीर पाठबळावर, सदिच्छांसह व श्री. विठ्ठलाच्या आशीर्वादस्वरूप 'स्वेरी' दिमाखात आपली वाटचाल प्रगती व समृद्धीकडे करते आहे. ग्रामीण भागात तंत्रशिक्षणाची ज्ञानगंगा वाहती करण्याचे स्वप्न सत्यात उतरले आहे. शिक्षण क्षेत्रात विशेषतः तंत्रज्ञान क्षेत्रात व्यावसायिक शिक्षण देत असताना विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे सर्वांगसुंदर व्यक्तिमत्व घडवण्याचा प्रयत्न आणि त्यासाठी आवश्यक असे नानाविध प्रयोग आम्ही स्वेरीच्या माध्यमातून करत आहोत. या प्रयत्नांना व प्रयोगांना यशही मिळत आहे आणि त्याचे उत्तम परिणामही दिसून येत आहेत.

स्वेरीच्या आदरयुक्त शिस्त व संस्कृतीचा परिपाक म्हणजे स्वेरीच्या वाटचालीत अनेक महनीय व्यक्तींचे असलेले स्वेरीच्या विकासातील योगदान, त्यांच्या शुभेच्छा व नित्य मार्गदर्शन! आमच्या अभिनव प्रयोगांना विद्यार्थ्यांची व पालकांची मिळालेली साथ तितकीच मोलाची आहे. एखादी व्यक्ती स्वेरीशी जोडली गेली की ती आमच्या परिवाराचा घटक होते आणि स्नेहाचे नाते वृद्धिंगत करते हा आमचा अनुभव आहे. 'स्नेहबंध' या पुस्तिकेच्या माध्यमातून स्वेरीला भेट देऊन मार्गदर्शन करणाऱ्या मान्यवर व्यक्ती, स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयात तंत्रशिक्षण घेऊन प्रगती केलेले माजी विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे 'स्वेरी' संबंधी असणारे प्रातिनिधिक अभिप्राय-अनुभव या पुस्तिकेत नमूद केले आहेत. एकूणच ही पुस्तिका स्वेरीच्या विविध पैलूंचे दर्शन आपल्याला घडवेल यात शंकाच नाही. यातले अभिप्राय आम्हास सदोदित अधिकाधिक परिश्रम व प्रयोग करण्यासाठी प्रेरणादायी ठरतील हे निश्चित. आपणा सर्वांसाठी 'स्नेहबंध' ही अभिप्राय पुस्तिका आम्ही सविनय सादर करतो! शुभेच्छांसह!

आपला स्नेहांकित,


**प्रा. डॉ. बी. पी. रोंगे**

संस्थापक-सचिव, 'स्वेरी'

प्राचार्य, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर

आणि

सदस्य, मॅनेजमेंट कौन्सिल, सिनेट व अॅकॅडेमिक कौन्सिल,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# मान्यवरांचे अभिप्राय


- 'अत्यंत प्रेरणादायी संस्था! शिक्षण आणि विकास यांचा समन्वय साधत, त्यांना जोडत या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना इथे समाविष्ट करून घेतले जाते. मला विश्वास आहे, भविष्यात शाश्वत विकास घडवण्यात ही संस्था मोलाची कामगिरी बजावेल. येथे कार्यरत प्रत्येकाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!'



**पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर**
Renowned Internatioal Scientist and Former Chairman, Atomic Energy Commission, Chairman, Rajiv Gandhi Science and Technology Commission, Government of Maharashtra

---

- 'अतिशय सुंदर कार्य करणाऱ्या स्वेरीला पहिल्यांदाच भेट देत असताना मनस्वी अत्यंत आनंद होत आहे. त्यांच्यासोबत ग्रामीण भागात सर्वदूर शिक्षणप्रसाराचे होणारे व BARC च्या माध्यमातून ग्रामीण भागात तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचे निरंतर कार्य उल्लेखनीय व वाखाणण्याजोगे आहे. भविष्यातील उज्ज्वल यशासाठी मी त्यांना सुयश चिंतितो.'



**पद्मविभूषण डॉ. आर. चिदंबरम**
Renowned International Scientist and Special Scientific Adviser to the Prime Minister's Office

---

- 'अप्रतिम कॅम्पस, आम्ही भेट देऊन आश्चर्यचकित झालो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, एक वेगळे कल्चर निर्माण करण्याचा एक मोठा प्रयत्न.'
'This is an institute created by Young generation Engineers of $21^{st}$ century. All staff and trustees are working together like a family with full dedication. We are very happy to wish them for the future growth in Education and Research.'



**श्री. दत्ताजीराव राणे**
Former Minister of Higher and Technical Education, Maharashtra State

- 'मला सांगायला अत्यंत आनंद वाटतो की, मी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक पदाचा कार्यभार घेताच या महाविद्यालयाच्या हॉस्टेलच्या पायाभरणीसाठी इथे आलो होतो. इथल्या विश्वस्त मंडळाला या महाविद्यालयाची सर्व दृष्टीने प्रगती व्हावी, असे मनोमन वाटते व याची तळमळ जाणवते. 'पंढरपुर पॅटर्न इन प्रोफेशनल एज्युकेशन' या पॅटर्नचा सर्वत्र गवगवा झालेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण कसे द्यावे, हे याठिकाणी प्राध्यापकांना शिकवले जाते. ज्याद्वारे प्रभावी ज्ञानदानाचे कार्य येथे चालते. इथल्या विद्यार्थ्यांसाठी रात्र अभ्यासिकेचा उपक्रम स्तुत्य आहे. कुठले कॉलेज तंत्रशिक्षण किती प्रभावी पद्धतीने देते? याचे मापदंड NBA व NAAC च्या माध्यमातून देता येते. या महाविद्यालयाला, त्यांच्या अभ्यासक्रमांना ही मानांकने ग्रामीण भागात असूनही मिळाली आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा जर बारकाईने अभ्यास केला तर निकालाच्या बाबतीत, प्रवेशाच्या बाबतीत स्वेरीचे हे कॉलेज आघाडीवर आहे. प्लेसमेंटच्या बाबतीतही हे महाविद्यालय आघाडीवर आहे. संशोधनाच्या बाबतीत BARC, RGSTC, DRDO, DST, RRCAT, AICTE, DAE इत्यादीच्या माध्यमातून सात कोटी रुपयांपर्यंतचा संशोधन निधी महाविद्यालयाने मिळवला आहे. उच्चशिक्षणासाठी अखिल भारतीय स्तरावरच्या परीक्षा इथला विद्यार्थी उत्तीर्ण व्हावा यासाठी GATE परीक्षेची तयारी करून घेतली जाते. संपूर्ण कॅम्पस संस्थेने Wi-Fi ने जोडला आहे. हे महाविद्यालय आपल्या कर्तृत्वाचे नवीन पल्ले भविष्यात गाठेल. BARC, NKN सारख्या संस्था ज्यावेळी एखाद्या संस्थेबरोबर करार करतात तेव्हा त्या सुद्धा या संस्थेची ऊर्जा व ताकद काय आहे? याचा साकल्याने विचार करत असतात. त्यांनी स्वेरीची ताकद ओळखली आहे. संस्थेच्या या वैशिष्ट्यांमुळे केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर पूर्ण देशातून विद्यार्थी येथे येत असतात. त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर त्यांनी सांगितले इथले सुरक्षित वातावरण व शिक्षणामुळेच ते येथे आले आहेत. भविष्यात स्थानिक प्रश्नांवर संशोधनाच्या माध्यमातून समर्पक उत्तर शोधण्यासाठी इथले अभियंते कटिबद्ध राहतील असा विश्वास वाटतो.'



**डॉ. एन. बी. पासलकर**
Former Director,
Directorate of Technical Education and
Former Member, MPSC

---

- 'या महाविद्यालयाचे मूर्त स्वरूप पाहून मला मनस्वी आनंद होत आहे. आपल्या आयुष्याला आकार देण्यासाठी हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी ज्ञानसाधना करण्यासाठी महाविद्यालयाच्या सुविधांचा विधायक उपयोग करत आहेत. प्राचार्य रोंगे सर यांचे प्रेरणादायी कार्य वाखाणण्याजोगे आहे. राष्ट्र उभारणीसाठी तरुण शास्त्रज्ञ इथे घडावेत. या संस्थेला मनःपूर्वक शुभेच्छा!'

**स्व. श्री. रावसाहेब शिंदे**
Freedom Fighter and Working President, Rayat Shikshan Sanstha, Satara

---

- 'पाहता पाहता भान हरपून गेलो. बरे वाटले. इथे बरेच काही घडत राहील असा विश्वास वाटतो.'

**स्व. प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले**
Former Vice Chancellor,
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Aurangabad and Famous Speaker, Thinker, Philosopher & Writer

- 'अत्यंत शिस्तप्रिय आणि नव्याचा ध्यास घेणारे महाविद्यालय पाहून अत्यंत आनंद झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुरू झालेले हे महाविद्यालयात आज शैक्षणिक क्षेत्रात वरच्या दर्जाला पोहोचले आहे. प्राचार्य, संस्थाचालक आणि शिक्षक यांच्या सामूहिक प्रयत्नातून आजचे हे रूप आले आहे. महाविद्यालयास शुभेच्छा!'

**डॉ. नागनाथ कोत्तापल्ले**
Senior Literary and Former Vice Chancellor Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

---

- 'दहा वर्षांपूर्वी श्रीमान दादासाहेब रोंगे यांचेकडून या शिक्षण संस्थेची संकल्पना ऐकली होती. तेव्हापासून या शिक्षण यज्ञाबाबत उत्सुकता होती. आज नेमके दशक पूर्तीच्या दिवशी येथे भेट देण्याची संधी मिळाली. याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो. कारण खासगी शिक्षण संस्था व शिक्षण क्षेत्राबद्दल बरेच काही ऐकायला मिळतं. त्याला तडा देणारे चांगले काम येथे झालेले दिसते. ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा कमी आहे व असतो असा राष्ट्रीय शैक्षणिक पाहणीचा अहवाल आहे. समाज व शासनापुढे माझा एक प्रश्न असतो की ग्रामीण भागातील गरिबांची लाखो मुले कच्ची कि त्यांना शिकवणाऱ्या शाळा कच्च्या? दहा वर्षात कल्पनेपेक्षा जास्त विस्तार, तोही दर्जेदार पाहून खूप आनंद झाला व श्रीमान रोंगे व त्यांच्या कार्यगटाला धन्यवाद व शुभेच्छा!'

**श्री. बाळकृष्ण रेणके**
Former Chairman, National Commission for Denotified, Nomadic and Semi-Nomadic Tribes

---

- 'माझे पूर्ण आयुष्य ISRO मध्ये गेले. मी बऱ्याच महाविद्यालयात गेलो. IIT व IISc इथे अध्यापनाचे कार्य केले. परंतु ग्रामीण भागांमध्ये तंत्र शिक्षण कसे दिले जाते? ते विद्यार्थी कसे आहेत? त्यांच्या अडचणी काय आहेत? याबद्दल मला जाणून घ्यायचे होते म्हणून मी स्वेरीमध्ये आलो. मी ISRO मध्ये डॉ. विक्रम साराभाई, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अशा लोकांबरोबर काम केले आहे. तिथे विकसित केलेले समाज उपयोगी तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे हा एक विचार माझ्या डोक्यात होता. म्हणून ज्या स्वेरीबद्दल बरंच वाचलं होतं, ऐकलं होतं, तिथे जावं आणि त्यांच्याशी संवाद साधावा असं मला वाटलं. इथे आल्यावर माझा अनुभव खूप छान होता. ग्रामीण भागात तंत्र शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे अवघड भाग आहे. पण इथे ते सहज होते. मी लहान असताना जर हे कॉलेज असतं तर मला इथेच शिकायला मिळालं असतं.'

**डॉ. अनंत पत्की**
Senior Scientist, ISRO

---

- SVERI के अध्यापक गण और विद्यार्थीयों में असीम प्रतिभा है और देशभक्ती कुटकर भरी है। मैं यहां के विद्यार्थियों के उज्वल भविष्यकी कामना करता हूँ।उनका राष्ट्रनिर्माण में विशेष योगदान हो जिससे राष्ट्र का विदेशो में अग्रगणीय स्थान विज्ञान, कृषी तथा मानवता क्षेत्र मे कायम रहे।

**डॉ. अखिलानंद पती तिवारी**
Associate Director, Knowledge Management Group, BARC and Senior Professor Homi Bhabha National Institute, Mumbai

---

- 'या ठिकाणी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरला उपस्थित राहण्याचा योग आला. महाविद्यालय परिसराबरोबरच इतर शैक्षणिक वातावरण व विद्यार्थी आणि प्राध्यापक यातील उत्साह व प्रेम पाहून आनंद वाटला. हे महाविद्यालय खरोखरच शैक्षणिक पंढरी आहे. शुभेच्छा!'

**श्री. रमेश गोरख घोलप** (IAS)
Deputy Commissioner, District: Koderma, Hazaribagh Division, Jharkhand

- ‘अत्यंत प्रसन्न वातावरण, विद्यार्थ्यांची विशेष शिस्त, स्पष्टपणे विचार करण्याची– मांडण्याची विद्यार्थ्यांची क्षमता हे इथले वैशिष्ट्य! विठ्ठलाच्या कृपाछत्राखाली हे महाविद्यालय आहे. विशेष म्हणजे इथल्या विद्यार्थ्यांमध्ये 'संस्कार' आहे. आपण निसर्गाचे देणे लागतो. ते देण्याची क्षमता इथल्या विद्यार्थ्यांमध्ये आहे. पेटंटच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात अतिशय भरीव कामगिरी हे विद्यार्थी करतील असा विश्वास वाटतो. शुभेच्छा!’

**श्री. अनंत ताकवले** (IPS)
Regional Passport Officer, Pune

---

- ‘स्वेरीच्या ध्येयाने, ते प्राप्त करण्याच्या दृष्टीने व संघ भावनेने कार्य करण्याच्या वृत्तीने मी अत्यंत प्रभावित झालो आहे. प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सर यांच्या दूरदृष्टीला आणि नेतृत्वाला सलाम! पूर्णतः वेगळ्या पद्धतीने तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात राबवल्या जाणाऱ्या योजना व शिक्षण प्रक्रिया येथे अनुभवास मिळाल्याने मी अत्यंत हर्षभरित झालो आहे.’

**श्री. विवेक सावंत**
Managing Director, MKCL

---

- सिर न झुके वो कोई दर नही, हर दर पे झुके वो कोई सर नही!
माथा टेकवावा असंच आपलं काम आहे. आपल्या नावीन्यपूर्ण व अनोख्या कामाबद्दल शुभेच्छा!

**श्री. रवींद्र आंबेकर**
Senior Journalist, Max Maharashtra

---

- ‘स्वेरीने संशोधनाच्या माध्यमातून BARC व DAE सोबत विकसित केलेले तंत्रज्ञान अत्यंत प्रभावीपणे वापरले आहे आणि त्याचा समर्पक प्रचार-प्रसार केला आहे. स्वेरीने या संशोधनाच्या माध्यमातून केलेल्या अंगीभूत कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.’

**डॉ. डी. के. दलाल**
Program Officer, BRNS and BARC

---

- ‘स्वेरीला भेट देऊन आनंद वाटला. प्राचार्य व सहकारी प्राध्यापक विद्यार्थी घडवून, त्यांच्या पायावर स्वाभिमानाने उभे राहतील असा सर्वांचा प्रयत्न आहे. सोलार लाईट, सोलार हिटर, रस्त्यावरील पूल ही काळाच्या गरजेनुसार वेगळेपणा व नावीन्य दर्शवणारे आहेत. इंजिनिअरिंगला प्रवेश कमी होत असताना येथे उत्तम प्रवेश होतात, यातच कॉलेजचे कर्तृत्व दिसते. प्लेसमेंट ही सर्वोत्तम आहे. विद्यार्थी विकासाचे ध्येय कर्मचाऱ्यांमध्ये दिसते. ते विद्यार्थ्यांचे विविध पैलू घडवतात. संशोधनही चांगले चालते. इमारत व इतर भौतिक सुविधा उच्च प्रतीच्या आहेत. सर्वांना शुभेच्छा!’

**श्री. बी. के. दहिफळे**
Divisional Secretary, SSC and HSC Board, Pune

---

- ‘विठ्ठलाच्या भूमीत प्रबोधनाची भूमिका घेऊन जो ज्ञानयज्ञ सुरू केला आहे. तो ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांसाठी परीसस्पर्श झाला आहे. आपल्या या ज्ञान यज्ञाचे म्होरके डॉ. रोंगे व त्यांचे सर्व सहकारी, संस्था यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कॅम्पस आणि विद्यार्थ्यांचे चैतन्य या गोष्टी निश्चितच महत्त्वाच्या आहेत. या चैतन्याला ज्ञानाच्या फांद्या फुटाव्यात म्हणून शुभेच्छा!’

**प्राचार्य डॉ. महेंद्र कदम**
Senior Educationist and Marathi literary & critic

■ 'मी इथे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या उत्तम शिक्षण पद्धती तसेच आदरयुक्त शिस्तीने प्रभावित झालो आहे. स्पर्धा परीक्षेच्या संदर्भातील मार्गदर्शनाच्या निमित्ताने इथल्या विद्यार्थी तसेच प्राध्यापकांशी संवाद साधता आला. छान अनुभव होता. धन्यवाद!'

**श्री. श्रीकांत गायकवाड**
Deputy Collector

---

■ 'शिक्षक दिनाच्या निमित्ताने इथल्या विद्यार्थ्यांशी हितगुज साधता आले. विद्यार्थ्यांमध्ये असणारे सुप्त गुण विकसित करण्याची दृष्टी व कार्य प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सर व स्वेरी हे नेहमीच करत असतात. भारत विकसित करण्यासाठी उत्कृष्ट अभियंते घडणे गरजेचे आहे. ते काम स्वेरी पूर्ण क्षमतेने करीत आहे.'

**डॉ. सागर कवडे**
Sub-Divisional Police Officer,
Pandharpur

---

■ 'सर्वोत्तम अशा इंजिनिअरिंग महाविद्यालयाला भेट देऊन मी अत्यंत आनंदी झालो आहे. हे महाविद्यालय स्वबळ व स्वनिर्मित मार्गदर्शक तत्त्वांवर प्रगतीकडे वाटचाल करते आहे. आपल्या भविष्यातील वाटचालीस मी सुयश चिंतितो!'

**डॉ. संजय मंगला गोपाल**
Former Assistant Dean and
Head of Department of
Mechanical Engineering, VJTI

---

■ 'अभियांत्रिकी क्षेत्रात ग्रामीण भागातील गरजा भागवण्यासाठी उच्च तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी दुवा म्हणून अतिशय मूलभूत काम करणारी संस्था म्हणून आवर्जून गौरव करावा असे वातावरण स्वेरीमध्ये आहे. समर्पित वृत्तीने काम करणारे शिक्षक उत्तम अभियंते घडवीत आहेत हे पाहून आनंद वाटला.'

**श्री. राजेंद्र पवार**
Managing Director,
Maharashtra Water Conservation Corporation,
Aurangabad

---

■ 'मी स्वेरी,पंढरपूर येथे पहिल्यांदाच कार्यक्रमाच्या निमित्ताने आलो. येथे असणाऱ्या सुमारे चार हजार विद्यार्थ्यांचा सळसळता उत्साह पण त्याचवेळी कमालीची शिस्त पाहून मी भारावून गेलो. विद्यार्थ्यांमध्ये काहीतरी नवीन जाणून घेण्याचे कुतूहल, त्यासाठी कष्ट करण्याची सकारात्मकता आणि त्यासाठीचे नियोजन सर्वोत्तम आहे. या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात असण्याचा न्यूनगंड बाळगण्याचे कारण नाही. इथे खूप ऊर्जा आहे. इथल्या प्रत्येक व्यक्तीत अफाट कर्तृत्व करण्याची क्षमता आहे. या क्षमतेला उत्तम पद्धतीने कार्यान्वित करण्याचे काम 'स्वेरी' उत्तम पद्धतीने करते आहे.'

**श्री. संजय अंभोरकर**
Vice President, H. R & Communication
Chassis Brakes International,
Pune

■ 'नाविन्यपूर्ण उपक्रमांना स्वेरीने नेहमीच एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. हे अतिशय गरजेचे आहे. इथल्या प्राचार्यांचे व प्राध्यापकांचे प्रयत्न अतिशय जवळून पाहिले आहेत. इथले विद्यार्थी तंत्रशिक्षणाप्रती समर्पित आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रचंड कष्टाळू आहेत. त्यांच्यात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द आहे. या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल आहे.'

**श्री. सुधीर मतेती**
Head HR, Syntel Telecom,
Pune

---

■ 'चांगले अभियंते व चांगला माणूस घडणे हे देशासाठी अतिशय महत्वाचे आहे. प्राचार्य डॉ. रोंगे सरांच्या व्यापक विचारातून येथे चांगले अभियंते तयार होत आहेत. इथले शिक्षकवृंद अतिशय कष्ट करून त्यांचे ध्येय जनतेसमोर नेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे इथले विद्यार्थी, त्यांच्या परिश्रम करण्याच्या वृत्तीने ज्या ही संस्थेत-कंपनीत जातील, तेथे त्या कंपनीचा, पर्यायाने, देशाचा विकास करण्यात हातभार लावतील.'

**श्री. कबीर गायकवाड**
Manager, Atlas Copco India Limited,
Pune

---

■ 'स्वेरी' ही संस्था गुणात्मकतेशी जोडली जात आहे, ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे. देशभरातील नामांकित संस्थांमध्ये या संस्थेचा गौरव आहे. 'Skill based literacy' हे आपले ध्येय ग्रामीण भागाच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. आपण या ध्येयासाठी धडपडत आहात. माझ्या आपणास शुभेच्छा व भविष्यात आपल्यासाठी काम ही करेन.'

**श्री. सतीश देशपांडे**
Co-Editor- 'Satyagrahi Vichardhara',
Research Fellow- UNICEF

---

■ 'मी मुल्यशिक्षणाच्या बाबतीत मार्गदर्शन करण्यासाठी अनेक महाविद्यालयांना भेटी दिल्या. परंतु सर्वार्थाने अत्यंत वेगळे वातावरण, उत्तम शिस्तीचा व संस्कारांचा अंगीकार मला इथे अनुभवायला मिळाला. इथले विद्यार्थी आदर्श विचारांचे भोक्ते आहेत. ते सकारात्मकतेने प्रतिसाद देतात. त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. सर्वांना शुभेच्छा!'

**श्री. एन. के. राजपुरोहित**
Values Education Lecturer and
High Court Advocate, Mumbai

---

■ 'स्वेरी' हे अभियांत्रिकी शिक्षणात मोठे नाव आहेच. त्याचबरोबर कोणत्याही समाजपूरक उपक्रमाच्या आयोजनात तेवढीच व व्यवस्थापनात त्यापेक्षा अधिक पारंगत आहे. स्वेरीमध्ये संघ भावनेने काम करणाऱ्या सर्वांच्या जिद्दीला सलाम!'

**प्रा. डॉ. रवींद्र चिंचोळकर**
Head of Journalism Department,
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University,
Solapur

■ 'शिक्षक चांगले असतील तर ती संस्थासुद्धा चांगली प्रगती करते असंच कुठेतरी या कॉलेजमध्ये आल्यावर जाणवलं. अतिशय कमालीची स्वच्छता, शिस्तबद्धता या गोष्टी मनाला भावल्या. आदरणीय रोंगे सर स्वतः सारखेच विद्यार्थी तयार करतील याची खात्री आहे.'

**श्री. मोहन जोशी**
Senior Actor

■ 'थोडक्यात सांगायचं तर अतिशय हुशार असं समाजातलं 'नवनीत' इथे आहे. मी इथे येऊन सन्मानित व  कृतकृत्य झाले.'

**डॉ. निशिगंधा वाड**
Senior Actress

■ 'मला हे महाविद्यालय अतिशय उत्कृष्ट वाटले. इथल्या आदरातिथ्याने मी भारावून गेलो. इथलं वातावरण ज्ञानार्जनासाठी अत्यंत पूरक आहे आणि नवनवीन विचार व सृजनात्मकता ही इथली वैशिष्ठ्ये आहेत. इथलं तंत्रशिक्षण म्हणजे आनंददायी शिक्षण प्रक्रिया आहे. मी या महाविद्यालयाचे सुयश चिंतितो.'

**श्री. अच्युत गोडबोले**
Senior Technician, Writer, Social worker and Thinker

■ 'शिवजयंतीच्या निमित्ताने मी स्वेरीमध्ये आलो. एखाद्या महाविद्यालयात नियोजनबद्ध व विद्यार्थ्यांना प्रेरक ठरणारे कार्यक्रम कसे घ्यावेत हे या महाविद्यालयात दिसले. शिवजयंतीच्या माध्यमातून, शिवाजी महाराजांच्या जीवनातील तत्त्व प्रणालींचा आणि प्रेरणांचा आपल्या व्यवहारात वापर करणे व त्याद्वारे पर्यायाने व्यक्तीसमूह व राष्ट्राची उन्नती करणे हा अशा कार्यक्रमाचा उद्देश असतो. हे इथे होत असल्याचे मला दिसले आणि या महाविद्यालयातील शिवजयंती मला भावली.'

**डॉ.अमर अडके**
Ayurvedacharya and Fort Practitioner, Kolhapur



# माजी विद्यार्थ्यांचे अभिप्राय

- ‘स्वेरीमध्ये प्रवेश मिळाल्यामुळे मी स्वत: ला खूप भाग्यवान समजतो कारण माझ्या अभियांत्रिकी पदवीच्या काळात तिथे मी खूप दयाळू आणि समर्पित व्यक्तींना भेटलो आहे. स्वेरीच्या व्यवस्थापनाने आणि खास करून डॉ. बी. पी. रोंगे सरांनी घेतलेले परीश्रम पाहून समर्पणाचा खरा अर्थ मला शिकायला मिळाला. सामान्य पार्श्वभूमीतील व्यक्तींनी सुरुवातीला एकत्र येऊन संस्थेची उभारणी केली व आजपर्यंत अनेक सुविधा निर्माण करून ही संस्था विकसित केली आहे तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.’

  ‘हा विकास आणि बदल मी माझ्या डोळ्यांनी पाहिल्यामुळे, त्या सकारात्मक स्पंदनांचा अनुभव माझ्यासाठी सदैव प्रेरणादायी ठरतो, जीवनाच्या प्रत्येक वळणावर मार्गदर्शन करतो आणि व्यावसायिक तसेच वैयक्तिक प्रगतीच्या मार्गावर आत्मविश्वास वाढवितो.’

  ’विद्यार्थ्यांचा व त्यायोगे समाजाचा विकास हे स्वेरीचे लक्ष्य आहे त्यामुळे स्वेरीच्या  व्यवस्थापनाने बऱ्याचदा त्यांच्या कर्तव्यांच्या पलीकडे जाऊन ग्रामीण आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत केलेली आहे आणि आज देखील ते कार्य अविरतपणे सुरु आहे. विद्यार्थ्यांना आधार देण्यासाठी संस्थेकडून बऱ्याच योजना सुरू आहेत आणि त्यामागील विचार स्पष्ट आहेत. मला उच्च शिक्षणात मोलाचे सहकार्य केल्याबद्दल संस्थेचे विश्वस्त श्री. एन. एस. कागदे सर यांच्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करण्याची मी येथे संधी घेतो.’

  ‘सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे मेहनती, सहृदयी आणि उच्च गुणवत्तेचे आहेत जे विद्यार्थ्यांना व समाजाला नक्कीच योग्य दिशेने नेतात त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी येथे प्रवेश मिळणे नक्कीच भाग्याचे आहे.’

**शाहू भांगे**
Senior Technical Superintendent, Fleet Ship Management Pvt. Ltd., Singapore
मेकॅनिकल इंजिनिअरींग-२००३ बॅच

---

- ‘स्वेरी, अभियांत्रिकी व इतर अभ्यासक्रम क्षेत्रात उत्तम काम करत आहे. माझ्या आयुष्यातील स्वेरीमधील चार वर्षे टर्निंग पॉइंट सारखी होती. या चार वर्षांनंतर माझे आयुष्य १८० अंशात बदलले. येथील शिक्षक व इतर कर्मचारी त्यांच्या कामात उत्कृष्ट आहेत. मला असे वाटते की संपूर्ण भारतामध्ये, प्रत्येक महाविद्यालयाने स्वेरी महाविद्यालयाची संस्कृती स्वीकारली पाहिजे. मी या महाविद्यालयातून उत्तीर्ण झाल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो.’

  ‘कृपया उद्योजक होण्यासाठी प्रयत्न करा. दुसऱ्या एखाद्यासाठी नोकरी करण्याऐवजी लोकांना नोकरी देणे चांगले. एखाद्याला श्रीमंत बनवण्याऐवजी स्वत:ला श्रीमंत बनविण्याचा प्रयत्न करा. मला उद्योजकता विकासाबद्दलही स्वेरीत बऱ्याचवेळा मार्गदर्शन लाभले.’

**प्रशांत रामचंद्र चांगण**
Chief Executive Officer, Great Wins Technical Services, Dubai
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००८ बॅच

---

- ‘मला स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूरचा माजी विद्यार्थी असल्याचा अभिमान आहे. मला कॉलेजची शिस्त आणि संस्कृती नेहमीच आवडली होती. मी शिस्त मानतो. कठोर परिश्रम ही यशाची प्रमुख गुरुकिल्ली आहे. मी येथे शिकलेले तंत्रज्ञानविषयक शिक्षण व सॉफ्टस्किल्स, माझी व्यावसायिक कारकीर्द बहरण्यास मला नेहमीच हातभार लावत असतात. माझ्या व्यावसायिक जीवनात नेहमीच महाविद्यालयीन प्राध्यापक आणि कर्मचारी यांचे खास स्थान आहे.’

**किशोर विठ्ठल शिंदे**
Senior System Analyst, NIIT Technologies, USA
कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग-२००९ बॅच

- ‘स्वेरी’ हे एक गुरुकुल आहे जे मूल्यांच्या आणि विश्वासाच्या जोरावर वाटचाल करत आहे. हे त्या सर्व विद्यार्थ्यांचे घर आहे जे त्यांच्या जीवनात यशस्वी होऊ इच्छितात. एखाद्या कठीण परिस्थितीला कसे सामोरे जावे लागते ते विद्यार्थ्यांना शिकवून स्वेरीने त्यांच संपूर्ण आयुष्य बदलले आहे. माझे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे सर जे नेहमी सांगायचे की ‘Tough times never last, Tough people do’. हेच स्वेरीने दाखवून दिले आहे. स्वेरी ही एक भावना आहे आणि प्रत्येकाने प्रेम आणि काळजी यांचे प्रतिक म्हणून ही भावना जपली पाहिजे. देवा, माझ्या कॉलेजला सदैव आशीर्वाद दे! या महाविद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी आपल्याला भाग्यवान असणे आवश्यक आहे. या महाविद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थी केवळ अभियंताच नाही तर एक परिपूर्ण मनुष्यही होतो. कष्ट, धैर्य आणि वचनबद्धता ही मुल्ये ’स्वेरी’ नेहमीच शिकवते. उत्कृष्ट शिक्षकवर्ग, उत्कृष्ट पायाभूत सुविधा, उत्साही प्राचार्य, उत्कृष्ट कॅम्पस प्लेसमेंट या सर्व बाबींमुळे या संस्थेचा भाग होण्यासाठी खरोखरच भाग्य लागते.’

**हेमंत बाबू सुरवसे**
Distribution Manager, TATA Consultancy Services
कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग-२००५ बॅच

---

- ‘माझे कॉलेजचे दिवस अविस्मरणीय होते आणि खरं तर ते दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदी आणि फलदायी होते. मी माझ्या कॉलेजचा प्रत्येक क्षण जगलो आहे. स्वेरियन असल्याचा मला अभिमान वाटतो. स्वेरीमध्ये माझा अनुभव आश्चर्यकारक होता. मला माझ्या शिक्षकांकडून असीम प्रेम आणि धडे मिळाले. येथे शिक्षकांनी मला यशाच्या मार्गावर कठोर परिश्रम करायला लावले. स्वेरीचे ते दिवस मला खूप आठवतात. स्वेरीच्या अद्भुत ज्ञानदानाचे फक्त आभार मानायचे आहेत.’

**दीपक शिंदे**
Software Engineer, UBS, Pune
इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन
इंजिनिअरिंग-२०११ बॅच

---

- ‘स्वेरीत राबवण्यात येणाऱ्या प्रॉक्टर सेशन, प्रॅक्टिस सेशन, प्राणायम, कमवा व शिका योजना सारख्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो. विद्यार्थी दशेत असताना आम्हाला या महाविद्यालयाच्या शिक्षकांकडून खूप काही शिकायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी कॉलेज, मॅनेजमेंट, प्राचार्य डॉ. बी पी रोंगे, विभाग प्रमुख, आणि सर्व शिक्षक नेहमी तत्पर असायचे. कॉलेजचा भर हा संशोधनाकडे असल्यामुळे विद्यार्थ्यांनाही संशोधनामध्ये आवड निर्माण व्हायची. याचा फायदा पुढे जाऊन कंपनीत नोकरी करत असताना होतो. आमच्यात जडलेल्या या संशोधक वृत्तीमुळे आम्हा विद्यार्थ्यांना मार्केटमध्ये येणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकताना व वापरात आणताना काहीच अडचण येत नाही.’

**वीरेंद्र पवार**
Senior Manager, Vodafone Group
इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन
इंजिनिअरिंग-२००९ बॅच

---

- ‘स्वेरी’ अभियांत्रिकी, पंढरपूरचा माजी विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. या संस्थेचा आजपर्यंतचा विकास पाहून मला अत्यंत आनंद होतो आणि याबद्दल मी खूप समाधानी आहे. आम्हाला घडविण्यासाठी संस्थेच्या प्रत्येक सदस्याने केलेल्या मेहनतीबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ग्रामीण भागातला तरुण अभियंता घडवीत राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात भरीव योगदान देणाऱ्या स्वेरीला

पुढे एक उत्तम भविष्य आहे अशी मला खात्री आहे. स्वेरीच्या भविष्यातील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!'

**श्रीराम करंडे**
Project Manager, GE Power India
प्रॉडक्शन इंजिनिअरिंग-२००३ बॅच

---

- 'स्वेरीला प्रवेश घेतल्याचा क्षण मला अजूनही स्मरणात आहे. काहीतरी करून दाखवण्याची ऊर्जा आणि उत्साहाने मी भारला गेलो होतो. या संस्थेच्या व्यवस्थापनाने येथील विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना शीर्ष स्थान दिले आहे व त्यांच्या सर्वांगींण विकासाला प्राधान्य दिले आहे. आपल्या विद्यार्थ्यांनी चांगले ज्ञानार्जन करावे अशी त्या सर्वांची इच्छा आहे. हे महाविद्यालय विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी खूप संधी निर्माण करून देते. येथील प्राध्यापकांनी मला केलेली मदत हि शब्दापलीकडची आहे. स्वेरी विद्यार्थ्यांना नेहमीच उच्च प्राथमिकतेवर ठेवते. मी स्वेरीचा एक भाग आहे हा खरं तर ही एक माझ्या आयुष्यातील एक मोठी उपलब्धी आहे. स्वेरीच्या पुढच्या वाटचालीस शुभेच्छा!'

**अभिजित नवले**
Senior Manager, Technimont Pvt. Ltd., Mumbai
प्रॉडक्शन इंजिनिअरिंग-२००६ बॅच

---

- 'तंत्रशिक्षण, उद्योगातील प्रगती, सकारात्मक दृष्टीकोन आणि सजग नेतृत्व यांचे उत्तम मिश्रण मला बहु-आयामी शिक्षणातून दिल्याबद्दल मी SVERI चा नेहमीच आभारी राहीन. येथील सर्व प्राध्यापक हे विद्यार्थी विकासाला समर्पित तज्ञ आहेत. त्यांच्या संबंधित विषयांमध्ये ते अतिशय उपयुक्त व प्रभावी ज्ञानदान करतात त्यांच्या विद्यार्थ्यांनी चांगले काम करावे अशी त्यांची सर्वांची इच्छा आहे. एकूणच कौशल्य विकासाबरोबरच करिअरच्या प्रगतीमध्येही लक्ष केंद्रित करणाऱ्या संस्थेत अभ्यास करण्यास मी नेहमीच उत्तेजन देतो. 'स्वेरी' ही अशीच एक संस्था आहे. या संस्थेचे व्यवस्थापन अतिशय समर्पित आहे. ते विद्यार्थी घडविण्यास प्राधान्य देते.'

**सचिन हराळे**
Plant Head, Lupin Pvt. Ltd.
प्रॉडक्शन इंजिनिअरिंग-२००५ बॅच

---

- 'सर्वांना नमस्कार! मी प्रितम कुलकर्णी, स्वेरी परिवारातील माजी विद्यार्थी! स्वेरीबद्दल जेवढं बोलावं तेवढं कमीच आहे. स्वेरी हे ज्ञानाचं भांडार आहे. तज्ञ प्राध्यापक वर्ग, प्रशस्त दालने, सर्व सोई सुविधा यांचा सुरेख संगम इथे आहे. स्वेरीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी वर्गाकडे असलेले प्राध्यापकांचे वैयक्तिक लक्ष! तसेच कॉलेजची एक स्वतंत्र शिक्षण पद्धत; ती म्हणजे 'पंढरपूर पॅटर्न इन प्रोफेशनल एज्युकेशन'. याचेच उदाहरण द्यायचे झाले तर स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा सर्व विद्यापीठ परीक्षांमध्ये सलग घवघवीत यश मिळवत, विद्यापीठात व परिसरात उंचावलेले स्वेरी कॉलेजचे नाव. मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो कि मला स्वेरीमध्ये शिकायला आणि तिथल्या परिवाराचा एक भाग व्हायला मिळाले. माझ्या मते, स्वेरी शैक्षणिक क्षेत्रात तर खूप उंचावर आहे परंतु सामाजिक क्षेत्रात सुद्धा अग्रेसर आहे. सढळ हाताने कित्येक ठिकाणी केलेली मदत, अनेक सामाजिक संस्था व वारकरी संप्रदाय या मंडळीना केलेली मोलाची मदत स्वेरीच्या अमूल्य माणुसकीचे दर्शन घडवते. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, त्यांचे मिळालेले मार्गदर्शन, संशोधन क्षेत्रात काम करणारे व्यक्ती, भारत सरकारचे विविध उच्चपदस्थ अधिकारी या सर्वांनी स्वेरीला दिलेल्या भेटी खूप अभिमानास्पद आहेत. स्वेरीचे हे शैक्षणिक संकुल सर्व स्तरातील मूल्यांवर आज भरभक्कम उभे आहे. यासाठी मी सर्व प्राध्यापक, ट्रस्ट यांचे आभार मानतोच पण

विशेष आभार मानतो ते प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सरांचे, ज्यांच्यामुळे हा भव्य वटवृक्ष मोठ्या दिमाखात अविरत उभा आहे. स्वेरीच्या खूप आठवणी आजन्म मनाला स्पर्श करून जाणाऱ्या आहेत. त्यामुळे स्वेरीमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश घ्यावा आणि या परिवाराचा भाग व्हावे!! स्वेरीच्या यशाचा आलेख असाच उंचावत राहील याबाबतीत खात्री आहेच. सर्व प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी, तसेच स्वेरीसाठी अहोरात्र काम करणारे सर्व घटक यांना मनपूर्वक शुभेच्छा !'

**प्रितम प्रकाश कुलकर्णी**
Manager, Sulzer India Pvt. Ltd. Pune
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००९ बॅच

---

- 'मी 'स्वेरियन' असल्याचा मला रास्त अभिमान आहे. मी २००८ च्या बॅचचा मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा विद्यार्थी आहे. माझा स्वेरी मधील प्रवास हा खूप उत्साहवर्धक व आनंददायक होता. स्वेरीमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त विविध कार्यक्रमांच्याद्वारे माझ्या व्यक्तिमत्व विकासासाठी मदत झाली. त्यामुळे मला जीवनातील विविध परिस्थितींशी झगडता आले. मी ग्रामीण भागातील विद्यार्थी असून सुद्धा मला स्वेरीतील संस्कारमय शिक्षणामुळे यशाच्या शिखरावर जाता आले.'

**हरेश्वर शेटे**
Dassult System Engineer, Research and Development Branch
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००८ बॅच

---

- 'मी सध्या जॉन डीयर मध्ये लीड आणि मॉड्यूल इंजिनियर म्हणून काम करतो. स्वेरी देत असलेल्या व्यावसायिक शिक्षणातील पंढरपूर पॅटर्नमुळे (PPEE) मला माझे व्यावसायिक कौशल्य वाढविण्यात मदत झाली. अभियांत्रिकीच्या ४ वर्षांच्या या पॅटर्नने माझे हात कधी सोडले नाही, प्रख्यात व्यक्तिमत्त्वे आणि करिअरच्या मार्गदर्शनामुळे माझे उद्दीष्ट साध्य करण्यात खरोखरच मदत झाली. मला प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सर यांचे विशेष आभार मानायचे आहेत. ज्यांनी मला सतत प्रेरणा दिली आणि माझ्यावर अखंड विश्वास ठेवला. त्यांनी माझ्यासाठी आणि माझ्या उर्वरित बॅचसाठी प्लेसमेंटच्या बऱ्याच संधी आणल्या. आता आम्ही आमच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचेही आभार मानू इच्छितो, ज्यांनी आम्हाला उद्योगांमध्ये आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी निरंतर मार्गदर्शन केले आहे.'

**प्रदीप शिंदे**
Lead Engineer, John Deere
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००५ बॅच

---

- 'मला स्वेरीमध्ये बऱ्याच चांगल्या उपक्रमात सहभागी होता आले. एकाग्रता कशी वाढवावी? आणि निरोगी जीवन कसे जगावे? हे मला प्राणायाम व योगा क्लासमुळे समजले. इंग्रजीकडे बघण्याचा कॉलेजचा दृष्टीकोन हा खूपच चांगला होता. त्यामुळे पाच इंग्रजी वाक्यांच्या गृहपाठामुळे आमचा इंग्रजी शब्दसंग्रह वाढला आणि आमच्यात इंग्लिशमध्ये संभाषणाबाबत आत्मविश्वास निर्माण झाला. स्वेरीची शिस्त, ही स्वेरीकडून मिळवलेल्या 'बेस्ट प्रॅक्टिसेस' पैकी एक. आपण यशस्वी होईपर्यंत फक्त प्रयत्न करा, अशी प्राध्यापकांची आणि प्राचार्य डॉ. रोंगे सरांची शिकवण खूप कामी आली. प्रा. के. एच. गायकवाड सर यांच्याकडून व्यवस्थापनाचे धडे मिळाले. प्राध्यापकांच्या शिकवणुकीमुळेच मी व्यवस्थापन व्यावसायिकात येऊ शकलो. धन्यवाद स्वेरी !'

**ईश्वर दत्तात्रय बाजारे**
Project Manager, HCL Technologies, Madurai
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००५ बॅच

■ 'विठुरायाच्या पावन नगरीमध्ये स्थापन झालेले प्रशस्त असे आपले 'SVERI' हे लोकप्रिय इंजिनिअरिंग कॉलेज! अधिक आनंददायी व सर्वांसाठी आश्वासक असे पहिले पाऊल या कॉलेजमध्ये पडते व 'विद्या विनयेन शोभते' हे ब्रीदवाक्य प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनामध्ये येथे आल्यानंतर रुजते. SVERI मध्ये असताना लागलेली स्वयंशिस्त, रुजलेली नीतिमूल्ये,मिळालेला आत्मविश्वास वेळोवेळी उपयोगी पडतो. याचाच प्रत्यय म्हणजे माझे ३ यशस्वी परदेशी अभ्यास दौरे. या कॉलेजमध्ये शिकून जीवन जगण्याचा नवा मार्ग मिळवून तर दिला जातोच पण त्याबरोबरच अद्वितीय, अष्टपैलू असे विद्यार्थी, देशाचे जबाबदार नागरिक येथे घडवले जातात. 'Give Respect, Take Respect' असे संस्कारबीज प्राचार्य डॉ. रोंगे सरांनी पेरल्याने कॉलेजला नेहमी सर्वच स्तरातून सन्मान मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजीविषयी असलेली भीती, न्यूनगंड, निराशा दूर सारण्याचा प्रयत्न शिस्तबद्धपणे प्राध्यापकांच्या माध्यमातून केल्यामुळे आजच्या स्पर्धेच्या काळात इंग्रजीवर प्रभुत्व आले. औद्योगिक दृष्टीकोन समोर ठेवून येथील विद्यार्थी घडविल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी सातासमुद्रापार यशस्वीपणे उत्तुंग भरारी घेतली आहे. खरंतर मी कॉलेजचा ऋणी आहे, असे म्हणून कॉलेजच्या ऋणातून मुक्त होणार नाही. माझा आणि 'SVERI' कॉलेजचा ऋणानुबंध कायम असेल, हीच विठुरायाच्या चरणी प्रार्थना!'

**अमोल सुभाष बनकर**
Senior Manager, TATA Motors
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००९ बॅच

---

■ 'स्वेरीचे अनेक उत्तम उपक्रम जसे की ५ वाक्ये, रात्रीचा अभ्यास, सराव सत्र, प्रॉक्टर, प्राणायाम, कमवा आणि शिका, रॅगिंगमुक्त संस्कृती व अनिवार्य उपस्थिती हे विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता लाभदायक आहेत. प्रत्यक्ष काम करण्यासाठी आवश्यक अशी शारीरिक, शैक्षणिक व मानसिक तयारी स्वेरीमध्ये विविध प्रशिक्षणे, पूर्वनियोजित कामाचे तास, आदरयुक्त शिस्त व संस्कृती, वक्तशीरपणा, कठोर परिश्रम व सुयोग्य मार्गदर्शनातून काम करण्याची वृत्ती अशा गोष्टींमुळे यशस्वीरीत्या करून घेतली जाते. याचीच फलश्रुती म्हणजे विद्यार्थ्यांना नोकरीच्या उत्कृष्ट संधी मिळवून देण्यात 'स्वेरी' अग्रेसर आहे.'

**चंद्रकांत बिराजदार**
Research and Development Engineer, Qualcom
इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग-२०१० बॅच

---

■ 'स्वेरीचे महाविद्यालय हे इतर महाविद्यालयांपेक्षा निश्चितच वेगळे आहे. या महाविद्यालयामध्ये शिस्त आणि अभ्यास करण्याची पद्धत खरोखरच प्रत्येक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवते. कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे सरांची विद्यार्थी घडवण्याची एक विशिष्ट पद्धत आणि त्यांच्याकडून मिळणारे मार्गदर्शन हे खरोखर अनुकरणीय आहे. स्वेरी कॅम्पस मध्ये अभ्यासासाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांचे इंग्लिश कम्युनिकेशन व्यवस्थित होण्यासाठी दररोज पाच वाक्ये लिहिण्यापासून तयारी करावी लागते. प्रॉक्टर सेशन, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, नाईट स्टडी प्रोग्राम, प्राणायाम यासारखे विविध उपक्रम राबवले जातात. गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना विद्यार्थ्यांना ऊर्जा देते. खरंच स्वेरीतून शिक्षण घेतल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. शेवटी मला आलेल्या अनुभवातून आवर्जून सांगावेसे वाटते ते म्हणजे तुम्ही जर स्वेरीतील प्रत्येक नियमांचे पालन केले तर आपल्याला यश नक्कीच मिळेल.'

**बालाजी सुरवसे**
Engineer, Atlas Copco
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२०१९ बॅच

■ 'इंजिनिअरिंगच्या ॲडमिशनपासून ते कोपको कंपनीत अभियंता म्हणून झालेल्या नियुक्ती पर्यंतच्या यशस्वी प्रवासात स्वेरीचा सिंहाचा वाटा आहे. स्वेरीमधील कार्यशैली इतरांपेक्षा वेगळ्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आर्थिक परिस्थितीची अडचण येऊ नये म्हणून स्वेरीच्या 'अर्न अँड लर्न' म्हणजे 'कमवा व शिका' या योजनेचा बऱ्याच विद्यार्थ्यांना मोठा फायदा होतो तसेच कॉलेजमध्ये विविध उपक्रम घेतले जातात. त्या उपक्रमांना मोठ-मोठ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना आमंत्रित केले जाते जेणेकरून स्वेरीमध्ये येणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर स्पर्धा परीक्षेत यश मिळण्यासाठी, समाजात काम करण्यासाठी प्रेरित केले जाते, उत्साह वाढविला जातो. महाविद्यालयांमध्ये ऑलंपस, क्षितिज असे विविध उपक्रम देखील घेतले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनामध्ये झेप घेता येते. या उपक्रमांतून स्वतःवर स्वतंत्र जबाबदारी दिली जाते. यातून मॅनेंजमेन्ट स्किल वाढीस लागते.तसेच कम्युनिकेशन स्किलवर कॉलेजमध्ये भर दिला जातो. शिक्षणा बरोबरच इतर बरीच ट्रेनिंग्ज दिली जातात. महाविद्यालयात प्रॉक्टर सेशन, नाईट स्टडी, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम इत्यादींचा समावेश असल्याने स्पर्धेच्या युगात देखील उत्तम नोकरी मिळवून देण्यासाठी वरील गोष्टी नक्कीच फायद्याच्या ठरतात.येथील शिक्षणाबाबत एकच सांगावेसे वाटते की करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर स्वेरी कॉलेजचे पुरेपूर सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन मिळते. शिक्षकांचे सहकार्य देखील उत्तम आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अग्रेसर म्हणून स्वेरी महाविद्यालयाची गणना केली जाते. शेवटी पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी चरणी प्रार्थना करतो की, स्वेरी महाविद्यालयाची यशाची वाटचाल अशीच सुरू राहावी. शुभेच्छा!'

**अक्षय महादेव खांडेकर**
Engineer, Atlas Copco
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२०१९ बॅच

---

■ 'खरं तर माझ्या यशात स्वेरीचा लाख मोलाचा वाटा आहे. प्रथम वसतिगृह स्तरावर पाच वाक्ये इंग्रजीतून लिहायला लावायचे. ते नियमित तपासलेही जात असायचे. यामुळे आम्हा विदयार्थ्यांची इंग्रजीत सुधारणा झाली. यासाठी इंग्रजी वृत्तपत्र वाचन देखील कंपल्सरी करून घ्यायचे.त्यातले कठीण शब्द मातृभाषेत लिहिल्याने समजू लागले. त्यानंतर कॉलेज संपल्यानंतर तीस ते पंचेचाळीस मिनिटे प्रॉक्टर वर्ग चालायचे, त्यामुळे साहजिकच इंग्रजी भाषेत सुधारणा झाली.या माध्यमातून आमची इंग्रजी सुधारली. याचा फायदा आम्हाला पब्लिक इव्हेन्ट, स्टाफ मिटिंग, ग्रुप डिस्कशनमध्ये झाला. स्वेरीने विद्यार्थ्याच्या दैनंदिन वेळापत्रकावर अधिक लक्ष देऊन विद्यार्थ्यांसाठी अतिशय उत्तम आराखडा तयार केला होता. रोज सकाळी अर्धा तास मनापासून प्राणायाम केल्यामुळे शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ बनून विद्यार्थी निरोगी राहतो तसेच एकाग्रता वाढते. उद्योग व व्यवसाय संबंधित कार्यक्रम घेऊन तिसऱ्या वर्षात असतानाच उद्योजकांना आमंत्रित करून आम्हा विध्यार्थ्यांना पदवी नंतर उद्योजक बनण्यासाठी मार्गदर्शन केले. रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभाग अतिशय उत्तम काम करत असून विद्यार्थ्यांना शोधनिबंध लिहिण्याची सवय व त्याबद्दल पुरेपूर मार्गदर्शन दिले जाते. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग देखील सातत्याने कम्युनिकेशन स्किल आणि ॲप्टीट्युड बद्दल विविध प्रकारे मार्गदर्शन करत असतात. असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना जॉब मिळवण्यासाठी फायदेशीर ठरते.'

'तसेच स्वेरीमध्ये विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांद्वारे व्यासपीठ मिळवून दिले जाते व त्यामुळे विद्यार्थ्यांचे मॅनेजमेंट स्किल सुधारते. प्रत्येक वर्षी यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून रोख रक्कम दिली जाते. त्यामुळे येथील उत्कृष्ट निकालाची परंपरा आजही कायम आहे. कॉलेजमधील मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युकेशन आणि कॉम्प्युटर इंजिनिअरींग या सर्व विभागांना एन. बी. ए. मानांकन प्राप्त आहेत. एकूणच इंजिनिअरिंगच्या ॲडमिशन पासून ते कंपनीत अभियंता म्हणून काम करताना स्वेरीतील शिक्षणाचा फायदा झाला. म्हणून मला आजही

स्वेरीबद्दल अप्रूप वाटते. मला अभिमान आहे की मी स्वेरीतून शिक्षण घेतलंय. स्वेरीच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी खुप खुप शुभेच्छा!'

**विवेक भोसले**
Assistsnt Manager, Sulzer India Pvt. Ltd. Pune
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२०१२ बॅच

---

- 'स्वेरी हे विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहित करणारे चांगले शिक्षण संकुल आहे. खूप थोड्या संस्था असे उत्तम कार्य करतात. आय टी. क्षेत्रात येणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांसाठी केवळ सॉफ्टवेअर डेव्हलपर होणे पुरेसे नाही तर सहाय्यक (Support Specialist) म्हणून कार्य करणे हे देखील एक आव्हानात्मक करिअर आहे जे विद्यार्थ्यांनी दुर्लक्षित केलेले आहे. सहाय्यक म्हणून करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यात अनेक संधी उपलब्ध आहेत. त्या संधी सुरुवातीला कमी आकर्षक वाटतात परंतु एक सहाय्यक (Support Specialist) म्हणून सुद्धा बऱ्याच गोष्टी साध्य केल्या जाऊ शकतात.'

**सचिन अच्युत मेलगे**
Rocket Software, IT Support Specialist
कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग-२००८ बॅच

---

- 'स्वेरी हि एक सर्वोत्तम शिक्षण संस्था आहे. SVERI विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात अविरत चालणाऱ्या स्पर्धेसाठी तयार करते. जेंव्हा जेंव्हा मला माझ्या कॉलेजच्या दिवसांचे स्मरण होते तेंव्हा तेंव्हा मला परत कॉलेजमध्ये जाऊन ते शिस्तीचे, सुरक्षित व आनंदी वातावरण अनुभवावे असे वाटते. आदरणीय प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे सर हे स्वतः अतिशय परिश्रम घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात, त्यांच्या समस्या सोडवतात, आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देत त्यांना घडवतात. ऑल द बेस्ट स्वेरी!'

**राधिका रोंगे**
Quality Assurance Engineer, Allscripts, Pune
इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग-२००९ बॅच

---

- 'मी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधून २०१३ साली स्थापत्य अभियांत्रिकीमधून पदवी घेतली. आज आपणास सांगायला खूप अभिमान वाटतो कि, आज मी ज्या पदावर आहे, त्यात माझ्या कॉलेजचा सिंहाचा वाटा आहे. कॉलेज बद्दल सांगायचं झाल तर कॉलेजचे नियोजन आणि कष्ट विद्यार्थ्यांना घडविण्यात कोणतीही कसर ठेवीत नाहीत. मला घडविण्यात माझ्या स्थापत्य विभागातील शिक्षकांचे खूप मोठे योगदान आहे. कॉलेजच्या कार्यपध्दतीमुळेच आपण चांगल्या पदावर उत्तम पद्धतीने कार्य करू शकतो. माझ्या सारख्या ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना एकच संदेश देऊ इच्छितो की, स्वेरीमधून शिक्षण घेत आपल्यासारखा ग्रामीण भागातील विद्यार्थी चांगल्या पदावर पोहचू शकतो हा माझा वैयक्तिक अनुभव आहे. त्यामुळे महाविद्यालयाचे नियम पाळून अभ्यास करावा व आपला विकास साध्य करावा.'

**विजयकुमार पाटील**
Junior Engineer, Mumbai Municipal Corporation
सिव्हिल इंजिनिअरिंग-२०१३ बॅच

---

- 'माझा स्वेरीमध्ये विद्यार्थी व अंशतः पालक असा दुहेरी अनुभव आहे. 'रॅगिंग मुक्त संस्था' असा या संस्थेचा नावलौकिक आहे. विद्यार्थीनींसाठी अतिशय सुरक्षित वातावरण स्वेरी महाविद्यालयात आहे याची जाणीव असल्या कारणाने माझ्यानंतर माझ्या बहिणीच्या शिक्षणासाठी आम्ही हीच

संस्था निवडली. विद्यार्थ्यांचे ईप्सित ध्येय गाठण्यासाठी 'पंढरपूर पॅटर्न' अतिशय उपयुक्त आहे. मला स्वतःला त्याचा खूप छान उपयोग झाला. स्वेरीची आदरयुक्त संस्कृती आणि उत्तम संस्कारामुळे, हि संस्था महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर नावाजली जात आहे. मला स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी देखील 'पंढरपूर पॅटर्न' उपयुक्त ठरला आहे.'

**सचिन गायकवाड**
Class 2 Officer, Town Planner, Alandi Nagarparishad, Pune
सिव्हिल इंजिनिअरिंग-२०१५ बॅच

---

- 'स्वेरी ही तंत्रशिक्षण व संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारी एक चांगली संस्था आहे. आम्ही सर्व विद्यार्थी 'दुसरे विठ्ठल मंदिर' म्हणून स्वेरीकडे पहातो. कडक शिस्तीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या या संस्थेत अतिशय सुरक्षित असे विद्यार्थीपूरक वातावरण आहे. सर्व पालकांना मी वैयक्तिक पातळीवर सुचवू इच्छितो की, आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी, स्वेरीचे इंजिनिअरिंग कॉलेज हे अतिशय उत्तम आहे. स्वेरीमध्ये तंत्रशिक्षणाबरोबरच विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या चौफेर प्रगतीकडे लक्ष दिले जाते. आजमितीला ग्रामीण भागात असलेल्या या माझ्या महाविद्यालयातून शिकलेले अनेक विद्यार्थी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्या, शासकीय, निमशासकीय सेवा तसेच स्वयं-उद्योगात कार्यरत आहेत.'

**अमित सोडमीसे**
Assistant Professor, PES, College of Engineering, Pune
सिव्हिल इंजिनिअरिंग-२०१५ बॅच

---

- 'श्री. विठ्ठलाला प्रथम नमन करतो. मला ज्या माझ्या गुरुंनी उज्वल भविष्य घडवण्यासाठी मोलाचे सहकार्य केले त्या स्वेरी कॉलेजचे डॉ.बी.पी. रोंगे सर, सिव्हिल डिपार्टमेंटचे डॉ.पी.एम. पवार सर, डॉ. क्षीरसागर मॅडम आणि आपल्या सर्वांचे लाडके प्रा. एम. एम. पवार सर यांचा मी शतशः ऋणी आहे. 'स्वेरी' हे सोलापूर जिल्ह्यातील केवळ एक अभियांत्रिकी महाविद्यालय नव्हे, तर वास्तविक आयुष्यात शिस्त आणि ज्ञान देणारे मंदिर आहे. स्वेरी कॉलेज हे मुलींसाठी अतिशय सुरक्षित आहे. यामुळे स्वेरीमध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रवेश घेण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. स्वेरी कॅम्पस हा नाविन्यपूर्ण असा आहे. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ओपन ऑडिटोरियम हे आपल्या कॅम्पसचे वैशिष्ट्य आहे. खेळण्यासाठी डे-नाईट व्यवस्था असणारे मैदान, Wi -Fi सोयी ने युक्त हॉस्टेल्स आणि मेस, पिण्यासाठी शुद्ध पाणी अशी उत्तमप्रकारची सोय आहे. स्वेरी म्हणजे शैक्षणिक क्षितिजावर उगवलेला तारा आहे, जो सदैव ध्येयाने प्रेरीत आणि कष्टासाठी तयार असलेल्या व्यक्तींना मार्गदर्शक ठरेल.'

  'स्वेरीने शिकवलेले यशाचे तीन नियम Hard work, Hard work and Hard work in proper direction!'

**वैभव संभाजी क्षीरसागर**
Junior Engineer, Military Engineering Services,
Ministry of Defence, Government of India
सिव्हिल इंजिनिअरिंग-२०१६ बॅच

---

- 'स्वेरी' ही अशी जागा होती, जिने माझ्या क्षमतांना बळकट केले. मी ग्रामीण आणि गरीब कौटुंबिक पार्श्वभूमीचा होतो. त्यामुळे दहावीला ८५.२३% मिळवूनही माझे शिक्षण पूर्ण करणे मला शक्य नव्हते. स्वेरीच्या 'कमवा आणि शिका' योजनेमुळे अभियंता बनण्यास मला मदत झाली आणि आज मी जो काही आहे तो केवळ आणि केवळ स्वेरीमुळे!'

  'आदर आणि शिस्त ही स्वेरीची संस्कृती आहे, जी प्रत्येक बाबतीत मदत करते. महाविद्यालयाच्या प्रॉक्टर सेशन आणि अवांतर उपक्रमांमुळे आम्हाला बरंच काही शिकायला मिळालं आणि आमचा

आत्मविश्वास वाढला. उद्योजकता विकास, ट्रेनिंग व प्लेसमेंट मार्गदर्शन आणि संशोधनास चालना देणाऱ्या उपक्रमांमुळे आम्हाला उद्योजक होण्यासाठी आवश्यक ज्ञान-मार्गदर्शन मिळाले व प्रोत्साहित केले.'

'मी येथील महत्वाकांक्षी, समर्पित आणि विद्यार्थी विकासासाठी वचनबद्ध शिक्षकांमुळे या संस्थेला दररोज वाढत असताना पाहिले आहे. कठोर परिश्रम आणि धैर्य यामुळे चांगले काम करणारे हुशार विद्यार्थी तयार करण्यात स्वेरीला मदत झाली. मी माझ्या बॅचमधील अनेक मित्रांना पाहिले आहे ज्यांनी आपल्या कारकीर्दीत वेगळी उंची गाठली आहे आणि आपापल्या उद्योगात त्यांनी नावे कमावली आहेत. आमच्या सर्व आदरणीय प्राचार्य आणि शिक्षकांचे आभार! त्यांच्याशिवाय इतका मोठा पल्ला गाठणे शक्य झाले नसते.'

**बालाजी भारत खोत**
Engineer, Bridgestone India
Ferm: Greenex Enterprises
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२०१५ बॅच

---

- 'मला या सन्माननीय संस्थेचा विद्यार्थी असल्याचा अभिमान वाटतो. याच संस्थेतून डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर, मी या संस्थेत बी.ई. सिव्हिलसाठी प्रवेश घेतला. आमच्या विभागात शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी केली जाते. आमच्या विभागातील अनुभवी आणि पात्र शिक्षक नेहमीच शिकवण्यासोबत आपला व्यावहारिक अनुभव सांगतात आणि आम्हाला तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांना व्यावहारिक प्रोत्साहन व क्षेत्रज्ञान मिळविण्यासाठी विविध बांधकामाच्या ठिकाणी जसे की इमारती, रस्ते, पूल, बोगदे, आरएमसी प्लांट, हॉट मिक्स बिट्यूमिनस प्लांट येथे विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक भेटींची व्यवस्था करण्यात आमचा विभाग नेहमीच रस घेतो. आमच्या विभागाकडून व्यावसायिक अभ्यासकांना, पी. डब्ल्यू. डी. अभियंत्यांना आणि माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाच्या माध्यमातून संवाद साधण्यासाठी आमंत्रित करून आमच्यासाठी अतिथी व्याख्यानांचे आयोजन करण्यासाठी चांगला पुढाकार घेतला आहे. यासह, आमच्या शिक्षणाचा उत्तम भाग म्हणजे 'पंढरपूर पॅटर्न' ची प्रभावी अंमलबजावणी, जो या संस्थेचा कणा आहे. दररोज इंग्रजी मध्ये पाच वाक्ये लिहिणे, इंग्रजीमध्येच सर्वांशी संवाद साधणे यामुळे आम्हाला व्यावसायिक कारकीर्दीत प्रभावी इंग्रजी बोलण्यास मदत झाली आहे, नियमित अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांची रात्र अभ्यासिका सहाय्यक ठरते. कठीण विषयांसाठी, वैयक्तिक आणि व्यावसायिक पातळीवर आमचे संवाद कौशल्य सुधारण्यासाठी प्रॉक्टर सेशन हा एक स्तुत्य उपक्रम दररोज घेतला जातो. आमचे महाविद्यालय आमच्यासाठी दररोज प्राणायाम घेते ज्यामुळे आम्हाला निरोगी राहण्यास मदत झाली आणि एकाग्रताही वाढली. आमच्या महाविद्यालयाने गरजू व कमकुवत आर्थिक पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी यांच्यासाठी 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू केली असून यामध्ये त्यांना वसतिगृह व मेस शुल्काचा लाभ मिळाला आहे. आमचे महाविद्यालय आम्हाला GATE, MPSC, UPSC इ. विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरित करते आणि प्रशिक्षण देते. जर आम्हाला कामात कोणतीही अडचण येत असेल तर आम्ही आमच्या शिक्षकांना त्यांचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी केंव्हाही संपर्क करू शकतो यासाठी सर्व शिक्षकांचे मनापासून आभार व्यक्त करतो. स्वेरीतले ज्ञानार्जन हा चांगला अनुभव होता! या महाविद्यालयाचा मी सदैव ऋणी राहीन. धन्यवाद!'

**धनंजय राऊत**
Quality Control Engineer, Yamai Construction, Solapur
सिव्हिल इंजिनिअरिंग-२०१९ बॅच

- 'मी नेहमीच स्वेरीचे विशेष आभार मानते, विशेषतः डॉ बी. पी. रोंगे सरांचे! आमच्या कॉलेजच्या काळात त्यांचे आम्हाला नेहमी मार्गदर्शन लाभले. 'टफ टाइम नेव्हर लास्ट बट टफ पीपल डू' हे त्यांचे वाक्य माझ्या करिअरच्या प्रवासात आणि माझ्या रोजच्या जगण्यात मला नेहमी प्रेरणा देते. मी स्वेरीची कायम आभारी राहीन.'

**डॉ. कु. जयश्री शरद कुलकर्णी**
Assistant Professor, Vishwkarma Institute of Techology (VIT), Pune
इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग-२००५ बॅच

---

- 'माझी जी प्रगती आहे, त्याचे सर्वच श्रेय आदरणीय प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सर व एम. बी. ए. विभागाचे सर्व शिक्षक वर्ग यांना जाते. स्वेरीमध्ये शिकत असताना मला आवडलेल्या गोष्टी 'Give Respect Take Respect,' हे कल्चर, स्वेरीची शिस्त, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व कौशल्य सुधारण्याच्या दृष्टीने तळमळीने केले जाणारे प्रयत्न, स्वेरीचा PPPE पॅटर्न आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना रोजगार व उद्योगाभिमुख शिक्षण व कौशल्ये देत त्याला उत्तम संधी मिळवून देणे या आहेत.'

**दादासाहेब अनुसे**
Agricultural Entreprenuer
MBA (HR & Marketing)-२०१३ बॅच

---

- 'स्वेरी सध्या अभियांत्रिकी बरोबर मॅनेजमेंट अभ्यासक्रम क्षेत्रातही उत्तम काम करत आहे. एम. बी. ए. च्या दोन वर्षांत खुप काही शिकायला मिळाले. यामध्ये Time Management कसे करावे याचा खुप फायदा सध्याच्या काळात होतोय. तसेच सध्या बँकेत नोकरी करत असताना Finance मधील Knowledge, Marketing Skills-Techniques खुप उपयोगी पडत आहेत. खरंच स्वेरी मधून उत्तीर्ण झाल्याचा गर्व आहे मला. स्वेरीच्या भावी वाटचालीस खुप खुप शुभेच्छा!'

**महेश पाटील**
Assistant Manager, ICICI Bank, Nazhare
MBA-२०१९ बॅच

---

- 'मी संदीप सुभाष मेटकरी, स्वेरी महाविद्यालयातुन २००४ साली मेकॅनिकल इंजिनिअरिंग पूर्ण केले. गुरुजनांच्या कृपेने पुढे एम. ई. पूर्ण करून शासकीय तंत्र निकेतन येथे प्राध्यापक (क्लास वन ऑफिसर) म्हणून रुजू झालो. स्वेरीच्या सर्व शिक्षकांनी अतिशय 'हार्ड वर्क' करून आम्हाला घडवले व आताही ते विद्यार्थ्यांसाठी झटत आहेत. स्वेरीची सर्व घोडदौड आदरणीय प्राचार्य रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे व त्यातून अधिकाधिक उत्कृष्ट अभियंते बाहेर पडत आहेत. फक्त एक प्राचार्य म्हणून नाही, तर एक उत्कृष्ट लीडर म्हणून मी त्यांच्या कार्याला नेहमी सलाम करतो. स्पर्धेच्या या आधुनिक जगात आम्हाला निर्भयपणे उभे राहण्याची ताकत दिल्याबद्दल मी स्वेरी चा सदैव ऋणी राहीन.'

**संदीप सुभाष मेटकरी**
Professor, (Class One Rank)
Government Polytechnic,Solapur
मेकॅनिकल इंजिनिअरिंग-२००४ बॅच

■ 'नमस्कार! मी गुरुप्रसाद तेलकर. मी २००६ साली स्वेरीतून प्रॉडक्शन इंजिनिरिंग पूर्ण केले.एखाद्या गोष्टींत परफेक्ट होणे म्हणजे, आपण निवडलेल्या करिअरमध्ये यश मिळवणे. 'स्वेरी' ही संस्थाअसेच परफेक्ट इंजिनिअर बनवण्यासाठी कटिबद्ध आहे.ज्ञानदानासोबतच समाजातील एक सुजाण नागरिक बनण्यासाठी 'नैतिक मूल्ये' ही स्वेरी मध्ये शिकवली जातात.माझ्या जडण-घडणीमध्ये स्वेरीच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफचे योगदान आहे. मी, माझे मित्र-मार्गदर्शक-गुरुवर्य डॉ. रोंगे सरांचा सदैव ऋणी राहीन.'

**गुरुप्रसाद तेलकर**

Manager (Projects), Ador Welding Ltd.

प्रॉडक्शन इंजिनिअरिंग-२००६ बॅच

---

■ 'स्वेरी' हे ग्रामीण भागातील एक नावाजलेले अभियांत्रिकी महाविद्यालय आहे,जे विद्यार्थ्यांसाठी विशेषतः मुलींसाठी अधिक सुरक्षित आहे. स्वेरीमध्ये आयोजित विविध उपक्रमांमुळे माझे व्यक्तिमत्त्व तयार होण्याला खूप मदत झाली, जसे की पाच इंग्रजी वाक्ये, रात्र अभ्यासिका, सराव सत्र, प्रॉक्टर सेशन, प्राणायाम, कमवा आणि शिकवा इत्यादी. स्वेरीचा परिसर हा रॅगिंगमुक्त आहे; तसेच हे विद्यार्थिभिमुख महाविद्यालय आहे.प्लेसमेंटच्या उद्देशाने विविध उपक्रम इथे सतत राबविले जातात. डॉ. बी. पी. रोंगे सर माझे आदर्श आहेत, कारण त्यांनी आम्हाला खूप गोष्टी शिकवल्या. त्यांनी प्रत्येक परिस्थितीत विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले आहे व अजूनही असे मार्गदर्शन ते करत असतात. शेवटी मी केवळ स्वेरीमुळेच या पदावर आहे. स्वेरीचे मनःपूर्वक आभार!'

**श्रवण कुलकर्णी**

Software Developer, Reflexis Systems

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग-२०१७ बॅच

